महाराष्ट्र शासन

# उद्योग संचालनालय

# जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

## पात्रता अटी

- राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार
- विशेष प्रवर्ग - इ. मागास वर्ग / भटक्या जाती व विमुक्त जमाती/अनुसुचित जाती-जमाती/अल्पसंख्यांक/ महिला/अपंग/माजी सैनिक याकरिता ५ वर्षांची अट शिथिल (वय वर्षे ५० पर्यंत)

- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु २५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/ महामंडळाच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

## प्रकल्प मर्यादा

प्रक्रिया व निर्मिती (उत्पादन) प्रकल्पांसाठी कमाल रू.५० लाख व सेवा उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रू. २० लाख

## वाहन व्यवसायासाठी

ई-वाहतुक व त्यावर आधारित व्यवसाय एकाच नाममुद्रेवर ब्रँड आधारित संघटीत साखळी विक्री केंद्र, फिरते विक्री केंद्र, खाद्यान्न केंद्र इ.

प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान)

| प्रवर्ग | स्वगुंतवणूक | अनुदान | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| | | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| सर्वसाधारण | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |
| विशेष प्रवर्ग - इ. मागास वर्ग / भटक्या जाती व विमुक्त जमाती/ अनुसुचित जाती-जमाती/अल्पसंख्यांक/महिला/अपंग/माजी सैनिक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |

## बँक / वित्तीय संस्था यांचा सहभाग

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत स्वगुंतवणूक व राज्यशासनाचे (अनुदान स्वरूपातील) आर्थिक सहाय्य या व्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के अर्थसहाय्य बँकामार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्यूल बँका, खाजगी बँका, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि, इत्यादी मार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

## प्रशिक्षण

योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी नि:शुल्क निवासी स्वरूपाचे उद्योजकीय प्रशिक्षण उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषी पूरक उद्योग व्यवसायांसाठी १ आठवडा

## आवश्यक कागदपत्रे

• जन्म दाखला/शाळेचा सोडल्याचा दाखला. • शैक्षणिक पात्रतेसंबधीचे कागदपत्रे/प्रमाणपत्रे • फोटो • पॅनकार्ड • आधार कार्ड • नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्तऐवज भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती) (बँक मंजूरी नंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल).
• जातीचे प्रमाणपत्र (मागास प्रवर्गासाठी) • विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अल्पसंख्याक/अपंग/माजी सैनिक)
• स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचन पत्र (Undertaking) • प्रोजेक्ट प्रोफाईल • लोकसंख्या दाखला (ग्रामीण भागासाठी)

या योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील नमूद संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत

**www.maha-cmegp.gov.in** (Sponsoring Agency - DIC)

• अधिक माहितीकरिता संपर्क •

# जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर

उद्योग भवन, कलेक्टर ऑफिस जवळ, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५५४३८.